# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. ०४ नोव्हेंबर २०२२

### जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५९७/२०२२ भादंविसक २७९,३३७,३३८,४२७, मोवाकाक १८४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २७/१०/२०२२ रोजी २०.३० वा ते २०.४५ वा चे दरम्यान, रुपाभवानी मंदिरकडे जाणारे सर्व्हिस रोडवर, डी मार्ट जवळ असलेल्या सोलापूर टेक्सटाईल्स शोरूम समोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. ०४/११/२०२२ रोजी १४.३२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सौ. मनिषा अक्षय भुतडा, वय- ४४ वर्षे, व्यवसाय- वैद्यकीय व्यवसाय, रा. १४/१७, भवानी पेठ, घोंगडे बंगल्याचे समोर, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | कार क्रं. एम एच १२ बी पी ७१२७ चा चालक नामे सिध्दार्थ कांबळे, रा. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व फिर्यादीची मुलगी गौरी असे दोघे मिळुन फिर्यादीची ॲक्टीव्हा मोटार सायकल क्रं. एम एच १३ बी के ४५९५ यावरुन डी मार्ट भवानी पेठ येथुन घराकडे जात असताना, डी मार्ट जवळ असलेल्या सोलापूर टेक्सटाईल्य या शोरुम समोर आले असता, वरील आरोपीत वाहन चालकाने त्याचे ताब्यातील कार ही हयगयीने, भरधाव वेगाने, रहदारी कडे लक्ष न देता चालवुन, फिर्यादीचे मोटार सायकलीस धडक देवून त्यात फिर्यादीचे चेहऱ्यास, पोटाला, उजव्या हाताच्या मनगटाला तसेच दोन्ही पायांच्या गुडघ्यांना मार लागुन तसेच फिर्यादीचे उजवे डोळयाचे खाली व उजया हातास मनगटास फॅक्चर होण्यास कारणीभुत झाला. तसेच फिर्यादीचे मोटार सायकलचे समोरील भाग हा चेमटुन फुटुन सुमारे २०,०००/- रु चे नुकसानीस कारणीभुत झाला आहे म्हणून. तपास:- पोना/ ९१० नाईकवाडी |

### विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५४७/२०२२ भादंविसक ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २८/१०/२०२२ रोजी २२.३० वा ते दि. २९/१०/२०२२ रोजी ११.०० वा चे दरम्यान, शेख बिल्डींग, फ्लॅट नं. ०१, गौरीशंकर मेडीकलच्या पाठीमागे, बिलाल नगर, जुळे सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. ०४/११/२०२२ रोजी १६.४१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पद्मराज मोहन ठोंबरे, वय- ३५ वर्षे, रा. वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर सध्या- शेख बिल्डींग, फ्लॅट नं. ०१, गौरीशंकर मेडीकलच्या पाठीमागे, बिलाल नगर, जुळे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १०,०००/- रु एक होंडा कंपनीची लाल काळी रंगाची डिओ मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची मोटार सायकल क्रं. एम एच १३ ए पी ९११३ ही राहत असलेल्या शेख बिल्डींग, फ्लॅट नं. ०१, गौरीशंकर मेडीकलच्या पाठीमागे, बिलाल नगर, जुळे सोलापूर येथील पार्कींग मध्ये पार्क केलेली असताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीवाचुन, मुद्दाम लबाडीने फिर्यादीची मोटार सायकल चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- पोना/ १२२४ गवळी - ८९९५५८१२७६ |